**"सप्टेंबर २०२०" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

(क) **शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक ३ सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) व या विभागांतर्गत अन्य पाच कार्यालयांच्या आस्थापनेवरील ३१५ अस्थायी पदांना दिनांक २८ फेब्रुवारी २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक ३ सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना लागू असलेल्या परिभाषित निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीस निवृत्तीवेतन योजनेंतर्गत शासनाच्या अंशदानात वाढ करण्यात आली आहे.
- दिनांक ९ सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये मत्ता व दायित्वे यांची वार्षिक विवरणे सादर करण्यास दिनांक ३० सप्टेंबर २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक ९ सप्टेंबर २०२० च्या शासन पत्रान्वये केंद्र शासनाच्या कार्मिक, लोक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालय, कार्मिक व प्रशिक्षण विभाग, नवी दिल्ली यांचे One Week In-Service training program for the year २०२०-२१ for AIS Officers (IAS, IPS & IFoS),Officers working under the Central Staffiing Scheme and Central Secretariat Service (CSS) / Central Secretariat Stenographers Service (CSSS) officers या विषयाचे दिनांक १८ ऑगस्ट २०२० रोजीचे कार्यालयीन ज्ञापन माहिती व उचित कार्यवाही अग्रेषित केले आहे.
- दिनांक १० सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय अधिनस्त आस्थापनेवरील वाहनांचा सुधारित आढावा मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक ११ सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता यशदा, पुणे या संस्थेच्या रु.४४९.६४ लाख इतक्या प्रशासकीय खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी यापूर्वीच रु.३५९.८० लाख इतका निधी वितरित करण्यात आला आहे. आता रु.८९.८४ लाख इतक्या निधी वितरणास शासन मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १६ सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये निर्णयान्वये लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालयातील १७ अस्थायी पदांना दिनांक २८ फेब्रुवारी २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक १७ सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रबोधिनी, अमरावती या संस्थेच्या कार्यालयातील ८ अस्थायी पदांना दिनांक २८ फेब्रुवारी २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक २२ सप्टेंबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी विहित करण्यात आलेल्या महसूली विभाग वाटप नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या दृष्टीने सूचना दिल्या आहेत.
- दिनांक २४ सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या भविष्य निर्वाह निधीचे लेख्यांबाबत महालेखापाल कार्यालयाकडून पुरविण्यात येणारी विवरणपत्रे ऑनलाईन पद्धतीने काढून घेण्याबाबत सूचना दिल्या आहेत.
- दिनांक दिनांक २८ सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता वेतनासाठी यशदा, पुणे या संस्थेस रु.१,४८,६६५/- इतका निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक २९ सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण, औरंगाबाद या संस्थेस विकास प्रशिक्षण व तद्नुषंगिक खर्च तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनसाठी रु.१०.०० लाख (तिसरा हप्ता) इतके अनुदान वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक २९ सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेस एप्रिल ते सप्टेंबर २०२० या सहा महिन्यांकरिता योजनेतर खर्चाच्या पहिल्या हप्त्यापोटीसाठी (प्रशिक्षण शुल्क) रु.३९.६० लाख अनुदान वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**(ख) नियुक्ती / पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक**

- एका लघुटंकलेखकास निम्नश्रेणी लघुटंकलेखक संवर्गात प्रपत्र पदोन्नती देण्यात आली आहे.
- एका सहसचिवाला पदोन्नतीचा नियमित दिनांक मंजूर करण्यात आला आहे.

**(ग) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त**

- भारतीय प्रशासन सेवेतील १६ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- एका अवर सचिवाची बदली करण्यात आली आहे.

**(घ) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन**

- एका अवर सचिवाला प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे.
- उपसचिव-१, अवर सचिव-१, लिपिक टंकलेखक-१ अशा ३ अधिकारी / कर्मचाऱ्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- एका सहायक कक्ष अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(च) प्रशिक्षण / परीक्षा**

दिनांक २२ सप्टेंबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये "सन २०२१ पासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत कोणत्याही विभागीय परीक्षा घेतल्या जाणार नाहीतण तर विभागीय परीक्षांचे आयोजन प्रशासकीय विभागांनी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

**(छ) ज्येष्ठतासूची**

- दिनांक ९ सप्टेंबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील उच्चश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०२० रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक ९ सप्टेंबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील वरिष्ठ स्वीय सहायकांची दिनांक १ जानेवारी २०२० रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक ९ सप्टेंबर २०२० च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील निवडश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०२० रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

*****